Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06
वर्ष ३९, अंक ८, ७ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १४

पुणे, सोमवार, ९ मार्च २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

पुणे, मुंबई, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

**अग्रलेख**

## जा जरा दक्षिणेकडे!

वाढत्या कर्जांवरील व्याज व प्रशासन खर्च यांत राज्याचा ५५ टक्के महसूल कामी येतो. उरलेल्या ४५ टक्क्यांत १३ कोटींचे भले करण्यासाठी सरकारी उत्पन्न वाढायला हवे...

**क्रीडा**

## लक्ष्य सेनचे उपविजेतेपदावर समाधान

## भारत तिसऱ्यांदा ट्वेन्टी-२० विश्वविजेता

- सलग दुसरे विश्वविजेतेपद, एकूण तिसरे विश्वविजेतेपद, विश्वचषक जिंकणारा पहिला सहयजमान देश, उपान्त्य आणि अंतिम सामन्यात अडीचशेहून अधिक धावा करणारा पहिला संघ! ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये रविवारी भारताने धावांबरोबरच विक्रमांच्या राशी रचल्या. आयपीएलच्या प्रभावामुळे ट्वेन्टी-२० या प्रकारातील भारताचे वादातीत वर्चस्व यानिमित्ताने अधोरेखित झाले.
- दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुपर एट टप्प्यातील पहिल्या सामन्यात दारुण पराभव झाल्यानंतर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ पुढील प्रत्येक सामना अंतिम सामना असल्याच्या एकाग्रतेने खेळला. झिम्बाब्वे, वेस्ट इंडिज, इंग्लंड आणि अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध फलंदाजी करताना भारताने २०० ते २५० धावांचेच लक्ष्य ठेवले आणि ते पारही करून दाखवले.
- भारताची या स्पर्धेतली वाटचाल आदर्शवत नव्हती. भरवशाचे फलंदाज निराश करत होते. पण कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी आपल्या व्यूहरचनेवर आणि क्रिकेटपटूंवर विश्वास ठेवत मोजकेच बदल केले आणि ते यशस्वी ठरले. - **संबंधित / क्रीडा**




**तापमान**

कमाल ३६.०°से | किमान २१.०°से

**हवामानाचा अंदाज**
आकाश निरभ्र राहील.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी

मध्यपूर्वेला ही जी आग येताना दिसतेय ना, तिथे असू शकतं नवीन व्हिएतनाम!!

## राष्ट्रपतींच्या अपमानाची माफी नाही - मोदी

**नवी दिल्ली :** 'राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना दिलेल्या वागणुकीबद्दल पश्चिम बंगालमधील सुजाण जनता तृणमूल काँग्रेसला कधीच माफ करणार नाही', असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केला. एका महिला आदिवासी नेत्याचा आणि देशाच्या राष्ट्रपतींचा हा अपमान असल्याचेही ते म्हणाले. **-पान ४**

## महिला सक्षम, इतरांपेक्षा कमी नाहीत - राष्ट्रपती

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी महिलांची ताकद आणि कामगिरीचे कौतुक केले आणि त्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देण्यासाठी प्रोत्साहित केले. 'आपण कोणापेक्षाही कमी नाही' असे त्या म्हणाल्या. **-पान ४**

# खामेनींच्या पुत्राकडे इराणची सूत्रे?

## धर्मगुरूंच्या मंडळाकडून संकेत

**रॉयटर्स, दुबई**

**इराणच्या सर्वोच्च** नेतेपदी आयातुल्ला अली खामेनी यांच्यानंतर कोण असेल, यावर धर्मगुरूंच्या मंडळात एकमत झाले आहे. या मंडळातील आयातुल्ला मोहंमदमेहदी मिर्बाकेरी यांनी ही माहिती दिली. खामेनी यांचा मुलगा मोजताबा खामेनी यांची इराणच्या सर्वोच्च नेतेपदी निवड केल्याची शक्यता असल्याचे धर्मगुरूंच्या मंडळातील एका सदस्याने सूचित केले.

इराणच्या सर्वोच्च नेतेपदाची निवड करणाऱ्या धर्मगुरूंच्या मंडळातील वरिष्ठ सदस्याने सांगितले, की 'अमेरिकेसारख्या सैतानानेही त्यांच्या नावाचा उल्लेख केला आहे.' अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोजताबा खामेनी यांच्याशिवाय इराणला दुसरा पर्याय नसल्याचे विधान केले होते. त्यामुळे ही निवड केल्याचे अप्रत्यक्षरीत्या त्यांनी सूचित केल्याचे मानले जात आहे. मात्र, अद्याप काही प्रक्रिया बाकी असल्याचे मंडळातील सदस्यांनी सांगितले.

'इराणने आपला पुढील सर्वोच्च नेता निवडला आहे,' असे धर्मगुरूंच्या मंडळातील आयातुल्ला मोहसीन हैदरी अलेकासिर आणि अहमद अलामोल्होदा या दोन सदस्यांनी सांगितल्याचे वृत्त इराणमधील माध्यमांनी दिले आहे. या मंडळाच्या सचिवालयाचे प्रमुख आयातुल्ला हुसेनी बुशेरी हे धर्मगुरूंच्या मंडळाचा निर्णय सांगतील, असे अलामोल्होदा म्हणाले. हा निर्णय जाहीर करण्यासाठी सर्व मंडळाने एकत्र जमायचे, की प्रक्रियेतील हा भाग वगळून निर्णय जाहीर करायचा, हे अद्याप ठरायचे आहे, असे इराणमधील माध्यमांनी म्हटले आहे. सध्याच्या परिस्थितीत अशी बैठक शक्य नसल्याचे मंडळातील बहुतेक सदस्यांचे मत आहे. खामेनी यांच्या **(पान १३ वर)**

### तेहरानमधील तेलसाठे लक्ष्य

- इस्रायलने इराणमधील तेलसाठ्यांनाही लक्ष्य केले आहे. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी युद्धाच्या पुढील टप्प्यात अनेक आश्चर्ये पाहायला मिळतील, असा इशारा दिला आहे.
- ट्रम्प यांनी इराणला पूर्ण शरणागती पत्करण्याचे केलेले आवाहन इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी धुडकावून लावले आहे.
- लेबनॉनमधील इराणच्या पाठीराख्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी इस्रायलने लेबनॉनवर हल्ले केले आहेत. तेथे आणखी १२ जणांचा मृत्यू झाला आहे.
- एकूण मृतांची संख्या ३०० हून अधिक झाली आहे. नेतान्याहू यांनी युद्धाचा पुढील टप्पा जाहीर करताना इराणचे सरकार उलथून टाकायचे असल्याचे सांगितले.

## संसद अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून

**नवी दिल्ली, पीटीआय**

**संसदेच्या अर्थसंकल्पीय** अधिवेशनाचा दुसरा टप्पा अर्थात उत्तरार्ध सोमवारपासून सुरू होत आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. त्यावर चर्चा होणार आहे.

याशिवाय पश्चिम आशियातील युद्ध, इराणबद्दल सकारची भूमिका, रशियाकडून तेल खरेदी, पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरावलोकन हे मुद्दे विरोधक उपस्थित करतील.

पश्चिम आशियातील सुरू असलेले युद्ध हे अधिवेशनात प्रमुख मुद्दा ठरण्याची शक्यता आहे. भारताला रशियाकडून तेल खरेदीबद्दल अमेरिकेने दिलेली परवानगी यावरून विरोधकांनी आधीपासूनच रान उठवले आहे. त्यामुळे याबाबत सरकारची कोंडी होण्याची चिन्हे आहेत.

- संबंधित वृत्त पान ४

# प्रकल्पांची पूर्तता अडीच वर्षांत आवश्यक

## गतिमान विकासासाठी मुख्यमंत्र्यांची सूचना; गणेशखिंड रस्त्यावरील उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे काही मोठ्या शहरांच्या विकासाची गती मंदावली असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे भविष्यातील पूरक गुंतवणूक करण्यासाठी प्रकल्पांचे बांधकाम पाच ते सात वर्षांऐवजी दोन ते अडीच वर्षांत पूर्ण करावे लागेल,' असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे रविवारी व्यक्त केले.

'पुण्यासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरासाठी मजबूत पायाभूत सुविधा अत्यावश्यक असून, शहर वाहतूक कोंडीमुक्त कण्यासाठी बहुआयामी नियोजन करण्यात येत आहे. त्या दृष्टीने रस्तेनिर्मिती, उड्डाणपुलांबरोबरच भुयारी मार्गांना प्राधान्य देण्यात येत असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे लोकार्पण रविवारी फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झाले. त्या वेळी ते बोलत होते. महापौर मंजुषा नागपूरे, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार सिद्धार्थ शिरोळे, उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यावेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, 'दर्जेदार पायाभूत सुविधा हा विकासामधील महत्त्वाचा घटक आहे. सर्वोत्तम परिसंस्था असूनही पायाभूत सुविधांची कमतरता आणि कोंडीमुळे बेंगळुरूसारख्या **(पान १३ वर)**